**महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ मर्यादित**

**वृत्तपत्र कात्रणे**

**जनसंपर्क अधिकारी**

| | |
|---|---|
| वृत्तपत्राचे नांव- महाराष्ट्र टाईम्स (मुंबई टाइम्स) | पान .क्र.- ०१ |
| | दिनांक- ०३/०९/२०२२ |

# प्रवाशांच्या सुरक्षेसाठी मेट्रो सज्ज

## नव्या मार्गिकेवरील प्रत्येक स्थानकावर कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

म. टा. प्रतिनिधी

**मुंबई :** अचानक आरोग्याची समस्या निर्माण झालेला प्रवासी... कुठे बेवारस बॅग, आग अथवा अन्य आपतकालीन स्थिती आणि ती हाताळण्यासाठी धावणारे कर्मचारी... मुंबईकरांच्या सेवेत नव्याने दाखल झालेल्या दहिसर ते डी. एन. नगर मेट्रो २ अ आणि दहिसर ते अंधेरी पूर्व मेट्रो ७ मार्गिकेवर हे चित्र नित्याचे असते. रात्रीची शेवटची गाडी स्थानकातून सुटल्यावर या प्रात्यक्षिकांना (मॉक ड्रील) सुरूवात होते. महा मुंबई मेट्रो संचलन मंडळाकडून (एमएमएमओसीएल) रोज तीन मेट्रो स्थानकांवर हे प्रात्यक्षिक घेतले जाते.

मेट्रो प्रवासादरम्यान प्रवाशांची सुरक्षितता राखली जावी, तसेच प्रवाशांना आपतकालीन प्रसंगी तात्काळ मदत मिळावी, याकरिता विविध उपाययोजना 'एमएमएमओसीएल'कडून राबविल्या जात आहेत. त्यासाठी स्थानकावर कार्यरत असलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्याला प्रशिक्षित करण्याचे धोरण 'एमएमएमओसीएल'ने स्वीकारले आहे.

### रुग्णाला मदत, बेवारस वस्तू तपासणीचे प्रशिक्षण



एखाद्या प्रवाशाला अचानक आरोग्याची समस्या उद्‌भवल्याची घटना घडल्यास त्याला तात्काळ प्रथमोपचार देऊन रुग्णालयात दाखल करण्यासाठी आवश्यक मदत कशी द्यायची, याबाबत प्रशिक्षणाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले जाते. तसेच जिन्यावर अथवा पायऱ्यांवर प्रवासी चक्कर येऊन पडल्यास त्याला मदत कशी द्यावी, याबाबतही मार्गदर्शन केले जाते. एखादी बेवारस बॅग अथवा वस्तू आढळ्यास तिला हात लावणे धोकादायक असू शकते. त्यामुळे त्या संशयित वस्तूबाबत योग्य यंत्रणेला वेळीच माहिती देणे, तसेच तिची तपासणी करण्याचे प्रशिक्षण दिले जाते.

दरदिवशी या मेट्रो मार्गिकेवरील तीन स्थानकांवर हे प्रशिक्षण राबविले जाते. तर आठवड्यातून किमान एकदातरी प्रत्येक स्थानकातील कर्मचाऱ्यांना हे प्रशिक्षण देण्यात येते. दरदिवशी रात्री शेवटची गाडी स्थानकातून सुटल्यावर हे कर्मचारी प्रशिक्षणासाठी एकत्र येतात. त्यानंतर काही वेळ आपतकालीन स्थितीला समोरे जाण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचे प्रशिक्षण सुरू होते. गेल्या पाच महिन्यांपासून नित्यनियमाने हे काम सुरू आहे.

दरदिवशी हे काम सुरू असल्याचे एमएमएमओसीएलचे अधिकारी नमूद करतात. तसेच कर्मचाऱ्यांना वारंवार प्रशिक्षण देऊन त्यांची तयारी करून घेतली जाते, असेही अधिकाऱ्यांनी नमूद केले.